# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

लोकसेवा हक्क कायदा
Right to Public Service Act
आपली सेवा आमचे कर्तव्य

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पू.)
जि. ठाणे - 401 107. दूरध्वनी : 022-28121455, • E-mail Id : tp@mbmc.gov.in


O.C. (Legal) 2022-01

जा.क्र :- मनपा/नर/ 98 | 2022 - 2023 दिनांक :- 08 | 8 | 2022

// भोगवटा दाखला //

प्रति,

1) मे. वैभव सिध्दी कन्स्ट्रक्शन कं. चे भागीदार विशाल सी. गुप्ता (विकासक)
शॉप नं.8,9 वैभव हॅरिजोन, 90 फीट रोड,
प्लॅनेटरिअम कॉम्पलेक्स जवळ, भाईंदर (प.)

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

2) मे. डि.एन. पटेल (सल्लागार अभियंता)
101, पिटर प्लाझा, जे. एस. रोड, रिलायन्स इलेक्ट्रीसीटी, दहिसर (पश्चिम)

विषय – मौजे भाईंदर स.क्र.563/4पै.,4पै.,4पै.(जुना) 205/4अ,4ब,4क(नविन) जागेतील प्रस्तावित इमारत "वैभव हॉरीझन" इमारत क्र.1, 2 व 3 या इमारतीस As Built नकाशानुसार भोगवटा दाखला मिळणेबाबत.

संदर्भ -1) सल्लागार अभियंता मे. डी. एन. पटेल ॲण्ड असो. यांचा दि.21/02/2022 रोजीचा अर्ज. (या कार्यालयास प्राप्त आ.क्र. नर /575 दि.25/02/2022)

2) नागरी जमीन कमाल धारणा कायद्याकडील पत्र क्र. युएलसी/ठाणे/भाईंदर/ टे.नं.6/एसआर-1303 दि.18/07/2000 व पत्र क्र. युएलसी/टिए/टे.नं.6/भाईंदर/एसआर-1361 दि.26/07/2000 अन्वये कलम 8(4) चे आदेश.

3) जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडील पत्र क्र. महसुल/क-1/टे-1एनएपी/एसआर-57/2004 दि.09/09/2005 अन्वये अकृषिक आदेश.

4) महानगरपालिकेचे पत्र क्र. क्र.मनपा/नर/1702/2018-19 दि.05/07/2018 रोजीची सुधारीत बांधकाम परवानगी.

5) महानगरपालिकेचे पत्र क्र. पत्र क्र. मनपा/नर/3902/2018-19 दि.15/09/2018 रोजीचा जोत्याचा दाखला.

6) मे. डी. एन. पटेल ॲण्ड असो. (संरचना अभियंता) यांनी (Building Completion Certificate) दि.21/02/2022 रोजीचा इमारत पुर्णत्वाचा दाखला.

7) मे. डी. एन. पटेल ॲण्ड असो. (सल्लागार अभियंता) यांचेकडील दि.21/02/2022 रोजीचे इमारतीचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असलेबाबतचा दाखला.

8) मे. ड्रापलेट कन्सल्टंट यांचा दि.24/01/2022 रोजीचा प्लबींग बाबतचा दाखला.

9) साईट सुपरवाईझर मे. ड्रापलेट कन्सल्टंट यांनी दि.18/01/2022 अन्वये प्रस्तावित इमारतीच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेले साहीत्य योग्य दर्जाचे असल्याचा दाखला.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पू.)
जि. ठाणे - 401 107. दूरध्वनी : 022-28121455, • E-mail Id : tp@mbmc.gov.in

लोकसेवा हक्क काय
Right to Public Service A
आपली सेवा आमचे कर्तव्

O.C. (Legal) 2022-01

जा.क्र :- मनपा/नर/ 98 | 2022 - 2023 दिनांक :- 08/8/2022

10) अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. मनपा/अग्नि/1522/2021-22 दि.20/01/2022 रोजीचा अंतिम नाहरकत दाखला.

11) महानगरपालिकेचे उद्यान अधिक्षक यांनी पत्र क्र. मनपा/वृ.प्रा./289/2021-22 दि.23/09/2021 अन्वये झाडांची लागवड व संगोपन केल्याबाबतचा दाखला.

12) मा. कार्यकारी अभियंता (साबां) यांचेकडील पत्र क्र. मनपा/विद्युत/2800/2021-22 दि.15/11/2021 अन्वये सोलार वॉटर हिटींग सिस्टीम कार्यान्वीत असल्याबाबतचा दाखला

13) महानगरपालिकेच्या मा. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचेकडीस पत्र क्र. मनपा/पापू/1246/2021-22 दि.02/09/2021 अन्वये रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम कार्यान्वीत केल्याबाबतचा दाखला.

14) विकासकाचे दि.24/02/2022 रोजीचे शपथपत्र.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

**महोदय,**

विषयांकित जागेतील **मौजे भाईंदर स.क्र.563/4पै.,4पै.,4पै.(जुना) 205/4अ,4ब,4क(नविन)** जागेतील प्रस्तावित इमारत **"वैभव हॉरीझन" इमारत क्र.1 (पार्ट तळ + 13) क्षेत्र 3211.43 चौ.मी., इमारत क्र.2 (पार्ट तळ + 7) क्षेत्र 1167.30 चौ.मी. व इमारत क्र. 3 (स्टिल्ट + 2) क्षेत्र 128.90** एकूण बांधकाम क्षेत्र **4507.63 चौ.मी.** चे बांधकाम As Built नकाशाप्रमाणे **सल्लागार अभियंता मे. डि.एन.पटेल (नोंदणी क्र. नपा/नर/68/438/99-2000, दि.16/04/99 ते दि.31/12/2023 पर्यंतची मुदतवाढ)** यांच्या देखरेखीखाली पुर्ण झालेले असून सदरचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असल्याबाबत संरचना अभियंता मे. डी. एन. पटेल ॲण्ड असो. व सदर इमारतीच्या प्लंबींगचे काम योग्य झालेबाबत परवानाधारक मे. ड्रापलेट कन्सल्टंट यांनी दाखले दिलेले आहेत. यास्तव सदर **<u>वरीलप्रमाणे</u>** च्या इमारतीसाठी खालील अटीशर्तीच्या अधिन राहुन प्रस्तावित **"वैभव हॉरीझन"** इमारत क्र. 1,2,3 या इमारतीसाठी As Built नकाशाप्रमाणे प्रस्तावित इमारतीसाठी भोगवटा दाखला देण्यात येत आहे.

**अटीशर्ती -**

1) संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वयेच्या बांधकाम परवानगी / सुधारीत बांधकाम परवानगी मधील अटीशर्तीचे व विकासकाच्या संदर्भ क्र. 14 अन्वयेच्या शपथपत्राचे पालन करणे बंधनकारक राहिल.

जर

अ) मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आवश्यकता वाटल्यास कोणत्याही प्रकारची पुर्तता करणेस कळविल्यानंतर किंवा कोणताही प्रकारचा प्रतिबंध केल्यानंतर त्याचे पालन नाही केल्यास.

ब) आपण कोणत्याही प्रकारची माहिती लपवून किंवा चुकीची माहिती सादर करुन परवानगी / भोगवटा दाखला प्राप्त करुन घेतल्याचे मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची खात्री झालेनंतर सदरचा दाखला रद्द करणेचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

लोकसेवा हक्क कायदा
Right to Public Service Act
आपली सेवा आमचे कर्तव्य

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पू.)
जि. ठाणे - 401 107. दूरध्वनी : 022-28121455, • E-mail Id : tp@mbmc.gov.in


O.C. (Legal) 2022-01

जा.क्र :- मनपा/नर/ 98/2022-2023 दिनांक :- 08/8/2022

2) सदर इमारतीच्या बांधकामामध्ये भविष्यात कोणत्याही प्रकारचे फेरबदल करावयाचे झाल्यास त्याबाबत महानगरपालिकेची परवानगी प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

3) सदरच्या दाखल्यामध्ये नमुद केलेल्या वापरा व्यतिरिक्त भविष्यात बदल केल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा दाखला रद्द समजणेत येवून पुढील कार्यवाही करणेत येईल.

4) सदरच्या दाखल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कोणत्याही तरतुदी अन्वयेच्या कार्यवाहीसाठी बाधा येणार नाही.

5) सदरच्या दाखल्यामुळे अर्जदारास त्यांच्या मालकीच्या नसलेल्या कोणत्याही जमिनीचा कोणत्याही प्रकारे वापर करता येणार नाही.

6) सदर जागेच्या मालकीबाबतच्या मा. न्यायालयात सुरू असल्यास मा. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणे विकासकावर बंधनकारक राहील. त्याबाबत महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

7) अर्जदारांनी सादर केलेल्या दि.24/02/2022 रोजीच्या शपथपत्राप्रमाणे मलनिस्सारण व्यवस्था, सांडपाणी व्यवस्था, पाणीपुरवठा व्यवस्थाबाबत देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहिल.

8) सदर इमारतीचा वापर सुरु करणेपुर्वी सदर दाखला वेळी सादर केलेल्या सर्व विभागाकडील नाहरकत दाखला / प्रमाणपत्र / परवानगी यामधील अटीशर्तीची पुर्तता करणे बंधनकारक राहिल.

9) संदर्भिय पत्र क्र. 14 मधील हमीपत्रांचे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहिल.

10) रेखांकनामधील वाहनतळाची जागा कायमस्वरुपी सार्वजनिक वापरासाठी खुली ठेवणे बंधनकारक राहिल.

**(मा. आयुक्त सो यांचे मान्यतेने,)**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

(हे. रा. ठाकूर)
**सहाय्यक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रत - 1) कर संकलक व निर्धारक.
2) विभाग प्रमुख, अतिक्रमण तथा अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग.